"मराठवाडयातील नॅक मुल्यांकन झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचा वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत
पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक
श्री.किर्दंत विलास गोपीनाथराव
वसुंधरा महाविद्यालय,घाटनांदूर
ता.अंबाजोगाई, जि.बीड

मार्गदर्शक
डॉ.घोगरे गोविंद सुर्यभान
ग्रंथपाल
लोकमान्य महाविद्यालय,सोनखेड
ता.लोहा जि.नांदेड

वर्ष
२०१९-२०

"मराठवाडयातील नॅक मुल्यांकन झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचा वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास "

प्रस्तावना :-

महाविद्यालय हे मानवाला शिक्षण घेऊन ज्ञान प्राप्ती आणि व्यक्तिमत्त्व विकसीत करण्याचा प्रमुख घटक आहे. मानवाच्या शिक्षण आणि ज्ञान वृध्दिगत करण्याच्या प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमीका महत्वाची असते. शिक्षक आणि विद्यार्थी हे शिक्षण प्रक्रीयेतील दोन महत्वाचे घटक आहेत. शिक्षक वर्गामध्ये विशिष्ट विषयांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. परंतु वर्गातील शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विषयज्ञान पूर्णपणे आत्मसात करण्यास मर्यादा येते. विदयार्थ्यांना विषयाचे संपुर्ण ज्ञान मिळावे यासाठी ग्रंथालय उपयुक्त वाचन साहीत्य उपलब्ध करुन देते. त्यामुळे विद्यार्थ्याची ज्ञानप्राप्तीची जिज्ञासा पुर्ण होते.

आधुनिक युगाला अपेक्षीत असणारा ज्ञानाधिष्ठित विद्यार्थी निर्माण करण्यासाठी व त्याद्वारे आपल्या गावाचा, राज्याचा, राष्ट्राचा, विश्वाचा व पर्यायाने संपूर्ण मानव समुहाचा विकास साधण्यासाठीचे ज्ञान भांडार म्हणजेच ग्रंथालय होय. सर्व दृष्टीने ग्रंथालय परिपुर्ण व समृध्द असले पाहिजे. जगभर झालेला माहितीचा विस्फोट व सर्वच पातळीवरील व्यवहारांचे झालेले जागतिकरण व त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा संगणक, इंटरनेट या अत्याधुनिकशक्तीशाली व गतीमान माहिती साध-नांचा माहिती क्षेत्रातील होणारा वाढता वापर व माहिती, ज्ञानाला प्राप्त झालेले भांडवलाचे स्वरुप किंबहुना आजची सारी अर्थव्यवस्थाच ज्ञानाधिष्ठीत स्वरुपाची झालेली आहे. या सर्व पार्श्वभुमिवर शैक्षणिक क्षेत्रातील असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाना ऊर्जितावस्था आणण्यासाठी वित्तीय व्यवस्थापान सक्षम असले पाहिजे. ग्रंथालय समृद्ध आणि परीपुर्ण बनवायचे असेल तर ग्रंथालयास आर्थिक पाठबळ असणे गरजेचे आहे. कारण ग्रंथालयाचे सर्व व्यवहार आर्थिक बाबींवर अवलंबुन असतात.

विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) आणि नॅक मुल्यांकन (NAAC) :

महाविद्यालयाला शैक्षणिक आणि भौतिक सुविधांच्या निर्मिती आर्थिक अनुदान देण्यासाठी केंद्र सरकारने १९५६ मध्ये (यु.जी.सी.) विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि कृतिकार्यक्रम १९८६ च्या निर्देशानुसार विद्यापीठे आणि महाविद्यालय यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची सत्य पडताळणी व मुल्यमापन करण्याकरिता १६ सप्टेंबर १९९४ रोजी नॅक (NAAC) ची स्थापना केली.

नॅक अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व भौतिक सुविधांचे मुल्यमापन केले जाते. त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी यांच्या शैक्षणिक गुणवत्ता व कौशल्य विकासाकरिता कोणते उपक्रम राबविले जातात, राबविलेल्या उपक्रमातून कोणत्या स्वरुपात विकास घडून आला याचे मुल्यमापन केले जात आहे.

नॅक महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासात ग्रंथालयाची भौतिक आणि तांत्रिक सुविधा, ग्रंथालयातील संदर्भग्रंथ व अभ्यासक्रमीक पुस्तकांची खरेदी, वाचन साहित्यांची खरेदी, वाचन कक्ष, बैठक व्यवस्था, संगणक सुविधा इत्यादीची सत्य पडताळणी करुन गुण प्रदान करते.

ग्रंथालयातील साहित्य आणि भौतिक सुविधा निर्मिती करिता ग्रंथालय आवश्यक खर्चाच्या रक्कमेचा आराखडा तयार करते. ग्रंथालयाला आर्थिक पुरवठा महाविद्यालय, यु.जी.सी., विद्यार्थी बहिस्त वाचक यांच्याकडून होत आहे. अशा आर्थिक उपलब्ध रक्कमेचे व्यवस्थापन करणे ग्रंथालयाला महत्त्वाची गरज आहे.

ग्रंथालयाची इमारत, ग्रंथालयातील फर्निचर, उपकरणे, यंत्रे एवढेच नव्हे तर मनुष्य बळाचे मूल्य देखील पैशात करावे लागते. पैशाचे भक्कम पाठबळ असेल तर इतर साधने सहज मिळवता येतात. याचाच अर्थ दैनंदिन व्यवहारात पैशाची गरज असते कोणतीही प्रगती करावयाची असेल तर प्रथम पैशाचा विचार करावा लागतो त्यामुळे पैशाची आवक म्हणजे जमा आणि पैशाची जावक म्हणजे खर्च याबाबतीत नेहमी प्रत्येक घटकाला सतर्क रहावे लागते. संस्था चालविणे म्हणजे सतत खर्च करीत राहणे व खर्चासाठी लागणारे पैसे विविध मार्गाने मिळवित राहणे. या प्रकारामुळे वित्त गोष्टीला संस्थांच्या व्यवस्थापनात विशेष स्थान आहे. व्यवस्थापनाच्या सर्वच घटकांमध्ये वित्तीय घटकाला महत्व आहे.

व्यवस्थापन :

व्यवस्थापनही संज्ञा आपण व्यवहारात सदैव वापरीत असतो, व्यवस्था करणे म्हणजे नियोजान होय.

व्यवस्थापनाच्या व्याख्या :

१. पिटर : व्यवस्थापन हे बहुउद्देशीय साधन आहे त्यात उपयोगी धंद्याचे व्यवस्थापन होते. कामगार व काम याचे व्यवस्थान होते.

२. हेड्रीफेयॉल : व्यवस्थापन म्हणजे भविष्यकाळातील अंदाज, नियोजन, संघटन, आदेशन,समन्वय व नियंत्रण करणे.

वित्तव्यवस्थापन :

संस्थेच्या आर्थिक साधनाचे नियोजन आणि नियंत्रण करणारी व्यवस्थापकीय प्रक्रिया म्हणजे वित्तीयव्यवस्थापन होय. वित्त या गोष्टीला प्रत्येक संस्था आणि महाविद्यालय व्यवस्थापनात विशेष महत्व आहे. वस्तुच्या किमंतीत वाढ व घसरण यावरुन वित्ताचे मुल्य सतत बदलत असते. वस्तू महाग झाल्या की वित्ताचे मुल्य कमी होते. उलट स्वस्ताईत वित्ताचे मुल्य वाढते या प्रकारामुळेही वित्तास एवढे महत्व प्राप्त झाले आहे की, वित्तव्यवस्थापन ही एक वेगळी शाखाच होऊन बसली आहे. व्यवस्थापनाच्या सर्व घटकांवर तिचा पगडा बसला आहे. व्यवस्थापनात वित्त हे एक साधन असले तरी त्याचे व्यापक रुप लक्षात घेता नेहमीच्या व्यवस्थापनाच्या अंगाने त्याचा विचार न करता स्वतंत्रपणे व वेगळयारितीने करावा लागतो. इतर सर्व संस्थाप्रमाणेच ग्रंथालयाच्या वित्तव्यवस्थेचे दोन प्रमुख घटक आहेत. ते म्हणजे ग्रंथालयाचे उत्पन्न व त्यांचा खर्च या दोन प्रमुख घटकांचा मेळ बसविणे हे यातील कौशल्याचे काम आहे.

संशोधनाची आवश्यकता (Need for Study) :

महाविद्यालय ग्रंथालय हे महाविद्यालयाचा आत्मा आहे विद्यार्थी घडविण्याचे काम महाविद्यालयीन ग्रंथालय करत असते. अशी ग्रंथालय समृदध व परिपुर्ण असणे गरजेचे असते. त्यासाठी ग्रंथालयांना आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय परिपुर्ण व अद्यावत ठेवायची असतील तर ग्रंथालयाचे वित्तीय व्यवस्थापन व्यवस्थित असले पाहीजे. तेंव्हा महाविद्यालय ग्रंथालयात कोण कोणत्या मार्गाने वित्त पुरवठा होतो. व त्याचा विनियोग कशा पद्धतीने केला जातो हे जाणुन घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यासाठी संशोधकाने मराठवाडयातील नॅक मुल्यांकन झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचा वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास हा विषय निवडला आहे.

संशोधनासाठी विषयाची उद्दिष्टे (Aims and Objectives):

१. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथलयाचा सद्य:स्थितीचा शोध घेणे.
२. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयांना मिळणाऱ्या अनुदानासंबंधी नियमांचा आढावा घेणे.

३. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयांच्या वार्षिक अंदाजपत्रकाचा आढावा घेणे.
४. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयांना मिळणाऱ्या विविध अनुदानाची माहिती प्राप्त करणे.
५. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथलयास अन्य मार्गाने मिळणारे वित्तीय स्त्रोत जाणुन घेणे.
६. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयीन ग्रंथालयातील वित्तीय विनियोगाचे परिणामकारकता तपासणे.

ग्रहितके (Hypothesis) :

१. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयातील स्थिती समाधानकारक आहे.
२. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयांना मिळणारे अनुदान नियमावलीनुसार आहे.
३. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाचे वार्षिक अंदाजपत्रक आहे.
४. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयाना अनुदानाशिवाय अन्य विविध मार्गाने उत्पन्न मिळते.
५. मराठवाडयातील नॅक झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील तांत्रिक घटकाची सुविधा समाधनकारक आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology) :

सदरील संशोधनासाठी वर्णाात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. वर्णनात्मक संशोधन पद्धती सामाजिकशास्त्राच्या बाबतीत फार मोठया प्रमाणात वापरली जाते. वर्णनात्मक संशोधनात कोणत्या ही घटनेच्या, समाजाच्या सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्य:स्थितीचा सर्वकष अभ्यास करुन प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते.

माहिती साधने :

सदरील संशोधनासाठी लागणारी माहिती मुलाखत अनुसुची या साधनाद्वारे गोळा केली जाणार आहे. त्यासाठी ग्रंथपाल मुलाखत अनुसुची व प्रश्नावलीं चा वापर करण्यात येईल मिळविलेल्या माहितीचे विविध तक्ते आलेखांच्या साहयाने व SPSS या आज्ञावलींच्या साहयाने विश्लेषण करण्यात येईल.

ग्रंथालय वित्तीय व्यवस्थापनाच्या दुपटीने गरज :

सदरील संशोधन विषय वर्तमान काळात जी महाविद्यालय नॅक मुल्यांकनाला सामोरे जात आहेत तेथील ग्रंथालय क्षेत्रातील व्यक्तींना वित्तीय व्यवस्थापन कसे करावे या दृष्टीने मार्गदर्शक ठरणार आहे. तसेच ग्रंथालयाने खर्चाच्या बचतीत कशाप्रकारे नियंत्रण ठेवता येईल या दृष्टीने उपयोगी पडेल. त्याच बरोबर प्रस्तुत संशोधन महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या वित्तीय व्यवस्थापनावर संशोधन करणाऱ्या संशोधकांना मार्गदर्शक ठरेल.

व्याप्ती व मर्यादा (Socpe of the Study) :

व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती 'अ' दर्जा प्राप्त झालेल्या नॅक मुल्यांकीत वरिष्ठ महाविद्यालयाचा ग्रंथालयातील वित्तीय व्यवस्थापना पुरतीच असेल.

मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे इ.स. २००९-१० ते २०१९-२० या कालखंडातील मराठवाडयामधील नॅक मुल्यांकन 'अ' दर्जा प्राप्त महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वित्तीय व्यवस्थापना पुरताच मर्यादित राहिल.

संशोधन कार्याचे नियोजन :

अ.क्र.	संशोधन कार्याचा तपशील	कालावधी
१	पुर्वसाहित्याचा आढावा घेणे (संदर्भ ग्रंथ, अहवाल)	६ महिने
२	मराठवाडयातील नॅक झालेल्या 'अ' दर्जा प्राप्त महाविद्यालयाची माहिती मिळविणे.	६ महिने
३	मुलाखत अनुसूची तयार करुन महाविद्यालयीन ग्रंथपालाकडून भरुन घेणे.	६ महिने
४	मुलाखत अनुसूची मधील माहितीचे वर्गीकरण सारणीकरण विश्लेषण करणे.	६ महिने
५	संशोधन अहवाल तयार करुन सादरीकरण करणे.	६ महिने

प्रकरणाची रुपरेषाः

१. प्रकरण पहिले

प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात ग्रंथालय आणि संशोधनविषयाचे स्वरुप स्पष्ट करण्यात येईल संशोधन विषयाचा अर्थ, त्याचबरोबर विषयाची पार्श्वभुमी व संक्षिप्त माहिती, संशोधन क्षेत्राची माहिती, संशोधन कार्यात आलेल्या विषयांच्या व्याख्यांचे स्पष्टीकरण आणि संशोधनाचे उद्दिष्टे, व्यावसायिक दृष्टीकोणातुन संशोधनाची गरज यांची मांडणी करण्यात येईल.

२. प्रकरण दुसरे :-

संशोधन पद्धती व सबंधीत साहित्याचा आढावा

सदरील प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात येईल. त्याच बरोबर संशोधनपद्धतीचे स्वरुप, समस्यासुत्रण, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितकृत्ये, संशोधन पद्धती, संशोधन क्षेत्राची निवड, तथ्य संकलन, तथ्यांचे निर्वचन, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाचे महत्त्व मांडण्यात येईल.

३.प्रकरण तिसरे :-

ग्रंथालयाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात ग्रंथालयाच्या इमारतीचे स्वरुप,कर्मचाऱ्यांची उपलब्धता, ग्रंथसंख्या, ग्रंथालय फर्निचर, बैठक आसन व्यवस्था, तांत्रिक सुविधा, वाचन साहित्य, इत्यादींचा अभ्यास करण्यात येईल.

४. प्रकरण चौथे :

ग्रंथालय वित्तीय स्त्रोतांचा आढावा

सदरील प्रकरणात शासनाकडुन ग्रंथालयास उपलब्ध निधी, संस्थेकडुन दिला जाणारा निधी, देणगी स्वरुपात प्राप्त झालेला निधी, विद्यार्थ्याकडुन डयुज स्वरुपातील प्राप्त झालेली रक्कम, पेपररद्दी विक्रीतुन जमा रक्कम इत्यादींचा आढावा घेण्यात येईल.

५. प्रकरण पाचवे :

ग्रंथालय वित्तीय खर्चाच्या विनियोगाचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात ग्रंथालयास उपलब्ध झालेल्या वित्तीय निधीतुन होणाऱ्या खर्चाच्या स्वरुपाचा आढावा घेण्यात येईल. त्यामध्ये इमारत खर्च,फर्निचर खर्च, ग्रंथ खरेदी, बैठक व्यवस्थेवरील खर्च, वृतपत्रे व नियतकालिका वरील खर्च, रोजदारी तत्वावरील कर्मचाऱ्या वरील खर्च, तांत्रिक घटकांवरील खर्च, डीजीटल घटकांवरील खर्च,स्टेशनरी खर्च, इत्यादींचा आढावा घेण्यात येईल.

६.प्रकरण सहावे :

निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनास दिशा

संदर्भसूची :

१) कऱ्हाडे, बी.एम.शास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, २००७.

२) नागगोडे, गु.द. सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर: फडके प्रकाशन, १९८६.

३) भांडारकर, पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, औरंगाबाद: महाराष्ट्र, विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, मंडळ,१९७६.

४) पवार विठ्ठल, दिशा शिक्षणाच्या, मुंबई: एस.जी.प्रकाशन,२०१३.

५) दायमा ब्रिजमोहन, नॅकला सामोरे जातान,लातूर:विद्याभारती प्रकाशन,२००८.

६) पवार, एस.पी.ग्रंथालय व माहितीशास्त्र, कोल्हापूर: फडके प्रकाशन २००५.

७) बोराळकर, सविता, उदगीर : महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय ग्रंथालयाचे वित्तीय व्यवस्थापन : एक अभ्यास प्रबंधिका य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक,२००७.

८) Bhandarkar, P.L.Methodology and Techinques of social Research, Mumbai: Himalaya Publishing House, १९७७.

९) Busha, Charles H. And Harter, Stephen P., Research Methods in Librarianship Techniques social Research, Mumbai: Himalaya Publishing House,१९७७.

१०) सातारकर,सु.प. ग्रंथालय व्यवस्थान, नांदेड: अभय प्रकाशन, २००१.

११) काचोळे, दा.धो. सामाजिक संशोधन पद्धती, औरंगाबाद: कैलाश पब्लिकेशन, १९९८.

१२) गणपुले, श.रा.व्यवस्थापन मूलतत्वे कार्यपध्दती व मुल्यमापन नशिक: य.च.म.वि.२०००.

१३) रिसवडकर, म.रा.संशोधन व्याख्या आणि पध्दती, नाशिक:य.च.म.मु.वि.२०००.

१४) आगलावे, प्रदिप, संशोधन पद्धती, नागपूर: विद्या प्रकाशन,२०००.

१५) कायदे-पाटील, गंगाधर, संशोधन पद्धती, पुष्प चौथे, नाशिक: य.च.म.मु.वि.२००६.

१६) भागवत, शशिकला, ग्रंथालय व्यवस्थापन, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, २००३.

१७) कुलकर्णी, वि.वि.ग्रंथालय प्रशासन, नागपुर:सुविचार प्रकाशन मंडळ, १९७४.

१८) गणपुले,श.रा.ग्रंथालय साधनसामुग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन: स.च.म.मु.वि.२०००.

१९) मुळे प्राची, लातुर येथील श्री शिवछत्रपती ग्रंथालयाचे वित्तीय व्यवस्थापन : एक अभ्यास प्रबंधिका, य.च.म.मु.वि.२००९.

२०) कुमार पी.एस.जी., रिसर्च मेथडस ॲन्ड स्टॅटास्टिकल्स टेक्ननीक्स, दिल्ली: बी.आर.पब्लिकेशन, २००४.

संशोधक
श्री.किर्दंत विलास गोपीनाथराव
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
ता.अंबाजोगाई जि.बीड

मार्गदर्शक
डॉ.घोगरे गोविंद सुर्यभान
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
ता.लोहा जि.नांदेड